**महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ यांच्या मार्फत राबविण्यात येणा-या राष्ट्रीय कृषि विकास योजनेतुन मंजूर प्रकल्पाला प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः बैठक (वखार)१४१५/प्र.क्र.२५७/९-स**
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक :- ७.१२.२०१७

वाचा :-

१) सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग शासन निर्णय क्रमांकः बैठक (वखार)/प्र.क्र.२५७/९-स, दि.३१.३.२०१६

२) महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ यांचे पत्र क्र. मरारवम/क/बांधकाम/१५०६, दि.९.१०.२०१७

प्रस्तावना :-

मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दि. १८.६.२०१५ रोजी संपन्न झालेल्या राज्य स्तरीय प्रकल्प मंजुरी समितीच्या २० व्या बैठकीमध्ये महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, पुणे यांच्यामार्फत राबविण्यात येणा-या राष्ट्रीय विकास योजनेतून मंजूर करण्यात आलेल्या राज्यात आदीवासी व आत्महत्या प्रवण जिल्हयामध्ये ९ ठिकाणी साठवणूक सुविधा स्थापन करून ऑनलाईन ट्रेडींग व तारणऋणसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी एकूण रू. ९.८२ कोटी खर्चाच्या प्रकल्पास शासन निर्णय क्रमांक १ अन्वये मान्यता दिली होती. सदर प्रकल्पांतर्गत मंजूर गोदाम बांधकामाच्या ठिकाणांमध्ये यवतमाळ जिल्हयातील दारव्हा येथिल ३१५० क्षमतेच्या गोदामास मान्यता देण्यात आली होती. परंतु, मौजे साजेगाव, ता. दारव्हा, येथील सर्वे क्र. ११० पैकी २ हेक्टर जमिनीची किंमत जास्त असल्यामुळे जमिन उपलब्ध होऊ शकली नाही. त्यामुळे दारव्हा येथे राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत गोदामबांधकामाचा प्रकल्प उभारता येऊ शकला नाही. त्यामुळे महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाने वाचा मधील २ च्या पत्रात विनंती केल्याप्रमाणे प्रकल्पाची जागा बदलण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शुध्दीपत्रक:-

सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग शासन निर्णय दि.३१.३.२०१६ मधील परिशिष्ठ “अ” मध्ये अनुक्रमांक ७ वर जिल्हा यवतमाळ ठिकाण दारव्हा येथे ३१५० मे.टन गोदाम बांधकामास मान्यता दिली होती. त्याऐवजी आता महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाच्या स्वत:च्या ताब्यातील जागेमध्ये जिल्हा अमरावती तालुका चांदुरबाजार येथे १८०० मे. टन व उमरखेड जिल्हा यवतमाळ येथे १००० मे. टन क्षमतेचा गोदाम बांधण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

वरील सुधारणे व्यतिरिक्त वाचा क्रमांक १ मधील शासन निर्णयातील अटी व शर्ती सदर बांधकामांना लागु राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७१२०७१५२६३०२६०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षांकीत करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Mahendra Shantaram Pujari

Digitally signed by Mahendra Shantaram Pujari
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=CMTD DEPARTMENT, postalCode=400012, st=Maharashtra, 2.5.4.20=16153bd1d85632a421d5a5fd23bf5e5bb624d27f2c8cf59fb17e3ead3a034dbc, cn=Mahendra Shantaram Pujari
Date: 2017.12.07 16:48:36 +05'30'

**( महेंद्र पुजारी )**
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रत**

१. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
२. मा. अप्पर मुख्य सचिव (वित्त) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. मा. प्रधान सचिव (कृषि व पणन) मंत्रालय, मुंबई.
४. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र वखार महामंडळ, पुणे.
५. उप सचिव (पणन) सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. महालेखापाल, महाराष्ट्र ½ (लेखापरिक्षा / लेखा व अनुज्ञेयता) मुंबई/नागपूर.
७. कक्ष अधिकारी, राकृवियो/६अे/७अे, कृशि व पदुम विभाग
८. निवड नस्ती